वर्ष-०८ | अंक-३५ | मुंबई, मंगळवार १९ ते २५ जुलै - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 चादर-बेडशीट विकायला आले अन् मंगळसूत्र हिसकावून गेले; सहा तासात पोलिसांनी बेड्या ठोकल्या

3 → नवरा पाहिजेल तर पाच लाख दे, पत्नीकडून खंडणी मागणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

10 दिवसांचा नवजात चिमुरडा बेवारस अवस्थेत टेम्पोत आढळल्यानं आंबेगावात खळबळ! ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## मोबाइलमध्ये गेम खेळण्याच्या नावाने ‘गुगल पे’मधून गायब केले 22 लाख रुपये

गेम खेळण्यासाठी मोबाइल मागून दोघांनी एका ज्येष्ठ नागरिकाच्या बँक खात्यातून 22 लाख रुपयांची चोरी केली असल्याचा प्रकार समोर आला आहे.



मोबाइलमध्ये गेम खेळण्याच्या नावाने एका ज्येष्ठ नागरिकाला 22 लाखांना लुबाडले असल्याचा प्रकार समोर आला आहे. आरोपींनी 'गुगल पे' चा वापर करत या ज्येष्ठ नागरिकांच्या खात्यातून 22 लाख रुपयांचा अपहार केला. बेस्टच्या सेवेमधून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याच्या आयुष्यभराच्या कमाईवर डल्ला मारणाऱ्या दोघांना पोलिसांनी अटक केली.

मुंबईमध्ये गोरेगाव पूर्वमध्ये राहणारे प्रकाश नाईक ( 68 वर्ष) हे काही महिन्यांपूर्वी बेस्टमधून निवृत्त झाले होते. निवृत्तीनंतर त्यांना बेस्ट प्रशासनाकडून त्यांच्या बँक खात्यात त्यांनी केलेल्या सेवेचा मोबदला, देणी म्हणून जवळपास 22 लाख रुपये देण्यात आले. निवृत्तीनंतर प्रकाश नाईक गोरेगावमधील दिंडोशी बस आगाराजवळ दररोज फिरण्यासाठी जात असे. त्या ठिकाणी त्यांची ओळख अनोळखी मुलांसोबत झाली. ओळख झाल्यानंतर त्या दोन्ही मुलांनी प्रकाश नाईक यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर गेम खेळण्यासाठी हे दोघेही जण त्यांचा मोबाइल वापरत होते. या दोघांनी मोबाइलमध्ये गुगल पे हे मोबाइल ॲप डाउनलोड करत, त्यांच्या खात्यातून दोन महिन्यात 22 लाख रुपयांचा अपहार केला. ही चोरी इतकी बेमालूमपणे झाली की प्रकाश नाईक यांना याची काही माहितीदेखील झाली नाही.

प्रकाश नाईक एक दिवस बँकेमध्ये आपल्या बँक खात्याबद्दल माहिती घ्यायला गेले होते. त्यावेळी बँकेने माहिती दिल्यावर त्यांना मोठा धक्का बसला. या प्रकाराबाबत त्यांनी दिंडोशी पोलीस ठाण्यात जाऊन फसवणूक झाल्याची तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला. दिंडोशी पोलिसांनी या प्रकरणी दोन आरोपींना अटक केली. शुभम तिवारी (22 वर्ष) आणि अमर गुप्ता (28 वर्ष) असे आरोपींचे नाव असून त्यांनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आहे. हे दोन्ही आरोपी प्रकाश नाईक यांच्याकडून मोबाइलमध्ये गेम खेळण्याचा नावाने मोबाइल घ्यायचे. त्यामध्ये गुगल पेच्या माध्यमातून आपल्या अकाउंटमध्ये पैसे ट्रान्सफर करून घ्यायचे. ...पान २ वर...

## 170 गुंतवणूकदारांना 7 कोटींना गंडा

### मुंबई पोलिसांकडून एका व्यक्तीला अटक

दरमहा 100 कोटींच्या कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी विशेष केंद्रीय अन्वेषण (CBI) न्यायालयात डिफॉल्ट जामीनासाठी दाखल केलेली याचिका कोर्टानं फेटाळून लावलीय. गेल्या गुरुवारी दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यावर मुंबई सत्र न्यायालयातील विशेष सीबीआय न्यायालयाने आपला राखून ठेवलेला निकाल सोमवारी जाहीर केला. तपासयंत्रणेनं यासंदर्भात केलेला युक्तिवाद मान्य करत न्यायाधीश एस.एच. गवलानी यांनी देशमुखांसह त्यांचे सचिव संजीव पालांडे आणि कुंदन शिंदे यांनाही जामीन देण्यास नकार



दिला. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांनी राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर पदाचा गैरवापर करून भ्रष्टाचाराचे आरोप केल्यानंतर हयकोर्टाच्या आदेशानुसार सीबीआयनं यात गुन्हा दाखल केला होता. त्याच गुन्ह्याच्या आधारे ईडीने देशमुखांना अटक केली होती. त्यानंतर सीबीआयनेही कारागृहात जाऊन देशमुखांची गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी करत त्यांना अटक केली होती. सीबीआयनं देशमुख आणि त्यांचे सहकारी स्वीय सचिव संजीव पालांडे आणि खासगी स्वीय सहाय्यक कुंदन शिंदे यांच्यावर आरोपपत्र ...पान २ वर...

## गुन्हातील गाडी सोडणं अन् 25 हजाराची लाच मागितल्याप्रकरणी दोन पोलीस 'लाचलुचपत'च्या जाळ्यात

एका अपघाताच्या गुन्ह्यातील गाडी सोडणं अन् तपासात मदत करण्यावरून 25 हजारांची लाच मागणारे पोलीस लाचलुचपतच्या जाळ्यात सापडले आहेत. सांगली जिल्हा पोलीस दलातील जत पोलीस ठाण्यातील हे दोघेजण पोलीस कर्मचारी आहेत. गणेश ईश्वरा बागडी आणि संभाजी मारुती करांडे अशी लाचखोर पोलिसांची नावं आहेत. सांगलीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं ही कारवाई केली आहे. जत पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल




असलेल्या भावाला गुन्ह्यात मदत करण्यासाठी आणि या अपघातात जप्त असलेली मोटरसायकल सोडण्यासाठी दोन पोलिसांनी 25 हजार रुपयांची लाच मागितली. संबंधित तक्रारदार यांच्या भावावर जत पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल आहे. या अपघात प्रकरणी संबंधिताची दुचाकीही जप्त करण्यात आली आहे. या गुन्ह्यात संबंधिताला मदत करण्यासाठी आणि जप्त केलेली मोटरसायकल सोडवण्यासाठी गणेश ...पान २ वर...

## धक्कादायक! वाहनाचा वेग कमी करताना दुचाकीला पाठीमागून कंटेनरची धडक

### पुण्यात बापलेकीचा मृत्यू

पुणे : पुण्यात एक धक्कादायक अपघाताची घटना घडली. पुण्यातील सासवड रोड सातववाडी येथे वडील दुचाकीवर मुलीला शाळेत सोडवण्यासाठी जात असताना कंटेनरने दिलेल्या जोरदार धडकेत बाप-लेकीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. रस्त्यावरून जात असताना पुढील दुचाकीस्वाराने रस्त्यावर कचरा फेकला असता, त्याची धूळ अंगावर उडू नये याकरिता गाडीचा वेग कमी करताच पाठीमागून येणाऱ्या




कंटेनरने दुचाकीला जोराची धडक दिली. यात बाप-लेकीचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. तर शाळकरी मुलीला उपचारासाठी घेऊन जाताना तिचाही मृत्यू झाला आहे.

अंगावर कचरा येऊ नये म्हणून गाडीचा वेग केला कमी : हा अपघात सकाळी सात वाजण्याच्या सुमारास ग्लायडिंग सेंटरसमोर सातववाडी येथे झाला. नीलेश साळुंखे (वय ३५, रा. ढमाळवाडी, फुरसुंगी) मीनाक्षी साळुंखे (वय १०) अशी अपघातात मृत्यू झालेल्या ...पान २ वर...

## पावणे तीन लाख रुपये परत न दिल्याने 8 दिवस घरात डांबून ठेवलं

### सुटकेसाठी पाच लाखांची खंडणी



व्यवहारात मागील वर्षी दिलेले पावणे तीन लाख रुपये परत करत नसल्याने एका इसमाला घरात डांबून ठेवल्याची घटना उघडकीस आली आहे. धक्कादायक म्हणजे आरोपीने इसमाच्या पत्नीकडे सुटकेसाठी पाच लाख रुपयांची खंडणी मागितली. या प्रकरणी खंडणीची रक्कम स्वीकारताना आरोपी अजय जाधव याला टिळकनगर पोलिसांनी रंगेहाथ पकडून अतुल यांची सुखरुप सुटका केली आहे. डोंबिवलीत राहणारे अतुल व्यापारी हे बँकेतून कर्ज पास करुन देणे, व्याजाने पैसे देणे यांसारखे ...पान २ वर...

## पुण्यात अवघ्या चार मिनिटात चोरले 11 लाखांचे मोबाईल; घटना सीसीटिव्हीत कैद



पुणे : अवघ्या चार मिनिटात अकरा लाखांच्या मोबाइलची चोरी केल्याची घटना धायरी गावांतील रायकर नगर परिसरात शनिवारी पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

सांगळे टेलिकॉम मोबाईल हब या दुकानात ही चोरी झाली असून याप्रकरणी सचिन सांगळे यांनी सिंहगड पोलीस ठाण्यात (फिर्याद दिली आहे. यावरून सिंहगड रोड पोलिसांनी अज्ञाता विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेली माहिती अशी - शुक्रवारी पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास एका कटावणीच्या साह्याने दुकानाचे शटरचे सेंटर लॉक उचकाटून चोरट्यांनी दुकानांमध्ये प्रवेश केला. एका पोत्यात अवघ्या चार मिनिटात दुकानातील ओप्पो ,सॅमसंग ,रेडमी, विवो ,वन प्लस ,लेनोवो, जिओ कंपन्यांचे मोबाईल फोन टॅबलेट व स्मार्ट वॉच असे जवळपास ६१ मोबाईल व इतर वस्तू चोरले आहे. या सर्व मोबाइलची सरासरी किंमत काढली तर हे सर्व मोबाइल ११लाख रुपये किमतीचे आहे. तसेच गुन्हेगारांनी चोरी करताना पूर्ण तोंड कपड्याने झाकून घेतले होते. अंगावर पांढऱ्या रंगाचा नाईट सूट परिधान केले असल्याचा सीसीटीव्ही मध्ये दिसत आहे. चोरटे आजूबाजूच्या दुकानातमध्ये असणाऱ्या सीसीटीव्ही मध्ये दुचाकी वरून जात आसल्याचे दिसून आले आहे.

## भातसा नदीच्या काठावर चप्पल धुताना महिलेचा तोल गेला, जीवरक्षक पथकाने वाचवले प्राण

कल्याण : भातसा नदी पात्राच्या काठावर उभी राहून सँडलला लागलेला चिखल साफ करताना तोल जावून महिला नदीच्या पात्रात पडल्याची घटना गरसे गावानजीक घडली. महिला पाण्याच्या प्रवाहात वाहून जात होती. हे लक्षात येताच गरसे गावातील जीवरक्षक पथका ने स्वतःच्या जीवची बाजी लावत त्या महिलेचे प्राण वाचवले आहेत. रेश्मा जाधव असे वाचवण्यात आलेल्या महिलेचे नाव असून ती टिटवाळा येथील रहिवासी आहे. सुदैवाने महिला नदीच्या मध्यभागी खडकाचा आधार घेत अडकल्याने वाचवण्यात यश आले आहे. कुटुंबासह टिटवाळा येथे पाहुण्यांकडे आली होती



महिला रेश्मा जाधव या कुटुंबासह शहापूर तालुक्यातील एका गावात गेल्या होत्या. पाहुणचार घेतल्यानंतर सायंकाळच्या सुमारास जाधव कुटुंबीय पुन्हा टिटवाळा येथे घरी येण्यासाठी निघाले. यादरम्यान गरसे गावानजीक पुलावर निर्सगाचा आनंद घेण्यासाठी भातसा नदीच्या काठावर थोडा वेळ थांबण्याचा विचार त्यांनी केला. यावेळी त्यांच्या सँडलला चिखल लागल्याने तो साफ करण्यासाठी नदीच्या काठाजवळ त्या गेल्या आणि अचानक पाण्यात पडल्या. पावसामुळे पाण्याचा प्रवाह जास्त असल्याने त्या वाहून जायाला लागल्या. यावेळी त्यांच्या कुटुंबीयांनी मदतीसाठी आरडाओरडा सुरू केली. जीवरक्षक टीमने तात्काळ धाव घेत महिलेची सुटका केली आरडाओरडा ऐकून गरसे गावाचे पोलीस पाटील शशिकांत दिवाने यांनी जीवरक्षक टिमचे प्रदिप गायकर यांना तातडीने माहिती दिली. माहिती मिळताच गायकर यांनी कोणताही विलंब न करता भातसा नदी पात्राजवळ 10 मिनिटात घटनास्थळी बचाव उपकरणे, दोरी, जॅकेट घेऊन पोहचले. सुदैवाने नदिच्या पात्रातील खडकाचा आधार घेत महिला नदीच्या मध्यभागी प्रवाहात अडकली होती. यावेळी स्वतःच्या जीवची बाजी लावत जीवरक्षक टिमचे 5 सदस्य 500 मीटरहून अधिक अंतर पोहत गेले. वाहत्या पाण्यातून तिला बुडण्यापासून वाचवले असून या टीमचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शेअर ट्रेडिंग कंपनीचा डेटा चोरणाऱ्या पाच आरोपींना अटक, तिघे जण स्टॉक कंपनीचे माजी कर्मचारी



मुंबई : शेअर ट्रेडिंग कंपनीचा डेटा चोरणाऱ्या 5 जणांना मुंबई गुन्हे शाखेच्या सायबर शाखेने अटक केली आहे. अटक करण्यात आलेले तीन आरोपी हे स्टॉक ट्रेडिंग कंपनीचे माजी कर्मचारी आहेत. त्यांच्यावर स्टॉक ट्रेडिंग कंपनीचा डेटा चोरून तीन लोकांचे शेअर्स सुमारे 3.58 कोटींना विकल्याचा आरोप आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपीपैकी एकाने ओटीपी मिळविण्यासाठी इंटरनेटवरून कॉल केला होता आणि हा कॉल युनायटेड किंगडम (यूके) येथून असल्याचे...पान २ वर...

## पतीची हत्या करून मृतदेह बेडमधे लपवला, फरार पत्नीचा पोलिसांकडून शोध सुरू

मुंबई : साकीनाका परिसरात पत्नीने पतीची हत्या केली आहे. हत्या करून मृतदेह बेडमधे लपवणाऱ्या पत्नीविरोधात मुंबई पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून संशयित पत्नी फरार आहे. पोलीस तिचा शोध घेत आहेत. नसीम खान ( वय 23 ) असे हत्या झालेल्या पतीचे नाव आहे. तर रुबिना खान असे संशयित पत्नीचे नाव आहे. साकीनाका परिसरात सोमवारी सकाळी नसीम याचा बंद खोलीत मृतदेह आढळून आला. खोलीतून दुर्गंधी येत असल्यामळे शेजाऱ्यांनी याबाबत पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी नसीम याचा मृतदेह बेडमध्ये गुंढाळून ठेवल्याचे आढळे. साकीनाका पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला. संशयित पत्नी फरार असून पोलीस



तिचा शोध घेत आहेत.

मृत नसीम खान याचे 2017 मध्ये रुबिनासोबत लग्न झाले होते. पूर्वी ते पवईच्या आयआयटी चर्चमध्ये राहत होते. नसीम हा टेलरिंगचे काम करत होता. पती-पत्नीमध्ये वारंवार भांडणे होत होती. कुटुंबातील सदस्यांनी दोघांमधील वाद सोडवण्याचा अनेकवेळा प्रयत्न केला. परंतु, त्यांच्यातील वाद थांबला नाही. दोघेही 12 जुलै रोजी यादव नगर येथील सरवर चाळ येथे राहण्यासाठी आले होते, अशी माहिती शेजाऱ्यांकडून मिळाली. 14 जुलै रोजी नसीम याच्या वडिलांनी त्याच्याशी संपर्क साधण्यासाठी प्रयत्न केला. परंतु नसीमच्या पत्नीने सांगितले की नसीमची तब्येत बरी नाही आणि तो झोपला होता. 15 जुलै पासून नसीमचा मोबाईल बंद होता. त्यामुळे त्याचे वडील चौकशीसाठी ...पान २ वर...

पोलीस बातमी पत्र

मुंबई

२

मुंबई, मंगळवार १९ ते २५ जुलै - २०२२

पृष्ठ १ वरुन

## गुन्हातील गाडी सोडणं अन् 25 हजाराची लाच

ईश्वरा बागडी यांनी तक्रारदार यांच्याकडे 25 हजार रुपये लाच मागितली होती. याबाबत संबंधितानं बागडी यांच्याविरोधात सांगलीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. या तक्रारीच्या अनुषंगानं दोन दिवस बागडी आणि कारंडे यांची सापळा लावून चौकशी करण्यात आली. यामध्ये लाच मागितल्याचं निष्पन्न झालं. त्यानंतर आज संबंधित तक्रारदाराला 25 हजार रुपये घेऊन जत पोलीस ठाण्यात पाठवण्यात आलं. यावेळी संभाजी कारंडे यांनी तक्रारदार यांच्याकडून 25 हजार रुपये लाचेची मागणी करून ती स्वीकारली. याचवेळी लाचलुचपतच्या पथकाने त्यांना रंगेहात पकडलं. या प्रकरणी गणेश बागडी आणि संभाजी कारंडे या दोघांनाही अटक करण्यात आली आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक राजेश बनसोडे, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक सुजय घाटगे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक विनायक भिलारे, अविनाश सागर, प्रीतम चौगुले, धनंजय खाडे, संजय सपकाळ, रवींद्र धुमाळ, भास्कर भोरे, संजय कलकुटगी, राधिका माने यांच्या पथकानं केली.

## पावणे तीन लाख रुपये परत न

व्यवहार करतात. रेल्वेमध्ये मेकॅनिक म्हणून काम करणाऱ्या अजय जाधवने 2021 मध्ये अतुल यांच्यासोबत एक व्यवहार केला होता. त्यासाठी 2 लाख 80 हजार रुपये त्याने अतुलला दिले होते. मात्र पैसे परत देत नसल्याने अजयने अतुलला 9 जुलै रोजी भेटण्यासाठी बोलावलं. अतुल व्यापारी इथे आल्यानंतर अजय जाधवने त्याला मारहाण केली. यानंतर त्यांना माटुंगा येथील रेल्वे वसाहतीतील घरात डांबून ठेवले. इतकेच नव्हे तर अजयने अतुलच्या पत्नीला फोन करत नवरा सुखरुप पाहिजे असेल तर पाच लाख रुपये दे, अशी मागणी केली. अतुल यांच्या पत्नीने तीन लाख रुपये देण्याची तयारी दाखवली, मात्र अजय पाच लाख रुपयांवर अडून बसला. अखेर शुक्रवारी (15 जुलै) तिने टिळकनगर पोलीस ठाण्यात धाव घेत पतीचे अपहरण झाल्याची तक्रार दाखल केली. तक्रार दाखल होताच टिळकनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय आफळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग पिठे, पोलीस नाईक जाधव, घुगे, महाजन, चंदने यांच्या पथकाने अतुल यांचा शोध सुरु केला. पोलिसांनी प्लॅन आखला आणि पाच लाख रुपये घेण्यासाठी अजयला डोंबिवली पूर्वेतील फडके रोडवरील एका हॉटेलमध्ये बोलावले. या हॉटेलात पोलिसांनी सापळा लावत अजयसह अतुलला ताब्यात घेतले. रविवारी (17 जुलै) कल्याण जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आलं. कोर्टाने अजयला 20 जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पिठे यांनी सांगितले.

## धक्कादायक! वाहनाचा वेग कमी करताना

बापलेकीची नावे आहेत. मीनाक्षी साळुंखे साधना विद्यालयामध्ये इयत्ता पाचवीमध्ये शिकत होती. आज सकाळी नीलेश जेव्हा आपल्या मुलीला शाळेत सोडण्यासाठी निघाले तेव्हा सातववाडी येथे नीलेश यांच्या पुढे असलेल्या दुचाकीस्वाराने रस्त्याच्या कडेला कचरा फेकला आणि तो कचरा आपल्या अंगावर येऊ नये म्हणून नीलेश यांनी गाडी स्लो केली. पण, मागून भरधाव येणाऱ्या कंटेनरने त्यांना धडक दिल्याने नीलेश साळुंखे यांचा अपघात झाल्याने त्यांचे आणि त्यांच्या शाळकरी मुलीचा मृत्यू झाला आहे. वेगात येणाऱ्या कंटेनरने बापलेकीला दिली धडक : आपल्या मुलीला शाळेत सोडवण्यासाठी नीलेश साळुंखे फुरसुंगीहून हडपसरच्या दिशेने चालले होते. त्यावेळी सातववाडी येथे पाठीमागून आलेल्या ट्रकची धडक बसल्याने दुचाकीचालकाचा ट्रकच्या चाकाखाली येऊन जागीच मृत्यू झाला आहे. यावेळी बाजूला फेकल्या गेलेल्या मुलीला स्थानिक नागरिकांनी उपचारासाठी दवाखान्यात नेत असताना तिचाही मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच हडपसर पोलिसांनी कंटेनर चालकाला ताब्यात घेतले असून, दोघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी ससून रुग्णालयात पाठवण्यात आले आहेत.

## 170 गुंतवणूकदारांना 7 कोटींना गंडा

दाखल केलं. सीबीआयनं याप्रकरणी बडतर्फ पोलीस अधिक्षक सचिन वाझेला माफीचा साक्षीदार घोषित केलं आहे. मात्र याप्रकरणात तपासयंत्रणेकडे कोणतेही सबळ पुरावे नसल्याचा दावा करत देशमुख यांनी डिफॉल्ट जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. सीबीआयनं दाखल केलेले आरोपपत्र केवळ 59 पानांचे असून आरोपपत्र अपूर्ण असल्यामुळे देशमुख डीफॉल्ट जामीन मिळण्यासाठी पात्र आहेत. तसेच ताब्यात घेतल्याच्या 60 दिवसांच्या आत चौकशी पूर्ण होऊन आरोपपत्र कोर्टात दाखल आवश्यक आहे. त्यामुळे यात तपासयंत्रणेनं अपूर्ण आरोपपत्र दाखल केल्यामुळे देशमुख डिफॉल्ट जामीनासाठी पात्र असल्याचा दावाही देशमुखांनी याचिकेतून केला होता. मात्र सीबीआयनं या अर्जाला जोरदार विरोध केला होता.

## मोबाइलमध्ये गेम खेळण्याच्या नावाने

व्यवहार झाला असल्याचा आलेला मेसेज डिलीट केला जायचा. मोबाइलमधील सर्व पुराव्यांची स्वच्छता केल्यानंतर त्यांना पुन्हा मोबाइल द्यायचे. आरोपींनी अशा प्रकारची फसवणूक इतरांसोबत केली आहे का, याबाबतही पोलिसांकडून तपास सुरू असल्याचे परिमंडळ 12 चे पोलीस उपायुक्त सोमनाथ घार्गे यांनी सांगितले. आरोपींची चौकशी सुरू असून अधिक तपास दिंडोशी पोलीस करत आहे.

## पतीची हत्या करून मृतदेह बेडमधे लपवला

आले असता खोलीचा दरवाजा बंद असल्याने ते परत गेले. खोलीतून दुर्गंधी लागल्यामुळे शेजाऱ्यांनी खोली उघडली. यावेळी नसीमचा मृतदेह बेडमध्ये आढळून आला. शेजाऱ्यांची चौकशी केली असता त्याची पत्नी रुबिना बेपत्ता होती. शिवाय तिचे दोन्ही मोबाईल बंद आहेत. दरम्यान, नसीम याची रूबीनाने हत्या केल्याचा आरोप नसीम याच्या वडिलांनी केला आहे. शवविच्छेदनासाठी मृतदेह रूग्णालयात पाठवण्यात आला असून पोलीस रुबिनाचा शोध घेत आहेत. साकीनाका पोलीस ठाण्यात 302 आणि 201 अन्वये रूबीनावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शेअर ट्रेडिंग कंपनीचा डेटा चोरणाऱ्या

दिसून आले. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत. ग्राहकांचे शेअर्स परस्पर विकले सायबर सेलकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही डेटा चोरी मे ते 8 जून दरम्यान झाली आहे. ट्रेडिंग कंपनीच्या तक्रारीवरून पोलिसांनी जून महिन्यात अज्ञातांविरुध्द गुन्हा दाखल केला होता. आरोपींनी स्टॉक ट्रेडिंग कंपनीचे कर्मचारी असल्याचे भासवत तीन ग्राहकांना फोन करून त्यांचे ओटीपी मागितले आणि ओटीपी मिळताच त्यांनी त्या ग्राहकांच्या डिमॅट खात्यात प्रवेश घेतला. प्रवेश घेतल्यानंतर आरोपींनी ते शेअर्स विकले आणि ते विकल्यानंतर त्यांना 3.58 कोटी रुपये मिळाले जे त्यांनी दुसऱ्या कंपनीचे शेअर्स खरेदी करण्यासाठी वापरले. दिंडोशीत गूगल पे वरुन 22 लाखाची फसवणूक निवृत्त कर्मचाऱ्याच्या गूगल पे अकाऊंटवरुन 22 लाख रुपये फसवणूक करुन घेतल्याची घटना दिंडोशीत उघडकीस आली आहे. पीडित व्यक्ती बेस्टमधून निवृत्त झाले आहेत. निवृत्तीनंतर त्यांच्या अकाऊंटमध्ये 22 लाख रुपये बेस्ट प्रशासनाकडून जमा करण्यात आले होते. हे पैसे दोन तरुणांनी फसवणूक करुन काढून घेतले. पीडित व्यक्ती दररोज सकाळी मॉर्निंग वॉकला जातात. यावेळी त्यांची ओळख दोन तरुणांशी झाली होती. या ओळखीचा फायदा घेत या भामट्यांनी त्यांना 22 लाखाला चुना लावला. याप्रकरणी दिंडोशी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आळी आहे.

# चादर-बेडशीट विकायला आले अन् मंगळसूत्र हिसकावून गेले; सहा तासात पोलिसांनी बेड्या ठोकल्या



आठ तासात दोन मंगळसूत्र चोरीच्या घटनेने रविवारी शहरात खळबळ उडाली होती. मात्र औरंगाबाद शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकाने घटनेच्या काही तासात आरोपींना मोठ्या शिताफीने बेड्या ठोकल्या आहे. विशेष म्हणजे दुचाकीवर फिरून गल्लीबोळात चादरी-बेडशीट विकणारेच मंगळसूत्र चोर निघाले. याप्रकरणी पोलिसांनी जसपालसिंग बहादूरसिंग भाटिया (30), चंदनसिंग संतोषसिंग दुधानी (25) यांना अटक केली आहे.

**अशा घडल्या घटना...**

पहिल्या घटनेमध्ये उस्मानपुरा भागातील भाजीवाली पुतळयाजवळ विमल नंदकुमार ढगे या रिक्षामध्ये बसून आपल्या घराकडे जात असताना ब्रेकर आल्याने रिक्षाचालकाने वेग कमी केला. त्याचवेळी चोरट्यांनी मोटरसायकलवर येऊन विमल यांच्या गळयातील दीड तोळयाची पोत लंपास केली. ही फिल्मी स्टाईल चोरी उलटून आठ तास होतच नाही तोच, नागेश्वरवाडी पुन्हा एक मंगळसूत्र चोरीची घटना समोर आली. रेखा विजयराव नाईक या आपल्या नागेश्वरवाडी येथील घरातून दही आणण्यासाठी बाहेर पडल्या होत्या. तोच चोरट्यांनी मोटारसायकलवर येऊन त्यांच्या गळयातील सोन्याची चेन पळवली. विशेष म्हणजे या दोन्ही घटनेतील आरोपी एकच होते. तर तिसरी घटना पुंडलीकनगर हद्दीत घडली होती, मात्र त्यात गुन्हा दाखल नव्हता.

**असे अडकले चोरटे...**

या घटनेबाबत पोलिसांकडून तपास सुरु असतानाच पथकाने एका लॉजवर सहज विचारणा केली. आरोपींचे सीसीटीव्ही फुटेज लॉज व्यवस्थापकाला दाखवले असता दहा मिनिटांपूर्वीच हॉटेल सोडून गेल्याची त्याने माहिती दिली. त्यामुळे आरोपींनी हॉटेलमध्ये दिलेल्या मोबाईल नंबरवरून पोलिसांनी तांत्रिक तपास करत आरोपींच्या दौलताबादजवळ मुसक्या आवळल्या. त्यांच्याजवळून तीन मंगळसूत्रसहित 3 लाख 21 हजार हजाराचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

# बारामतीत पती-पत्नीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना, मित्राला करायला लावला पत्नीवर लैंगिक अत्याचार




बारामती : बारामती शहरातील तांदूळवाडी येथे पती-पत्नीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना घडली आहे. मद्यधुंद पतीने आपल्या मित्रालाच पत्नीवर लैंगिक अत्याचार करायला लावल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी बारामती तालुका पोलिसांनी संबंधित महिलेच्या पतीसह त्या मित्रावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघा आरोपींना अटक करण्यात आली आहे. शेखर माळशिकारे असे आरोपीचे नाव आहे. बारामती पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. मित्रासोबत जेवण केले मग पत्नीवर अत्याचार करायला सांगितले शेखर माळशिकारे हा आपल्या मित्राच्या घरी जेवणासाठी गेला होता. त्यावेळी या दोघांनी दारु पिऊन जेवण केले. रात्री उशिरा संबंधित महिलेच्या पतीने आपल्या मित्राला या विवाहितेवर अत्याचार करायला लावलं. संबंधित विवाहितेनं विरोध केल्यानंतर त्या मित्रानं तिला मारहाण केली. या प्रकारानंतर संबंधित महिलेने बारामती तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. बारामती पोलिसांनी संबंधित पतीसह मित्र शेखर माळशिकारे याच्यावर गुन्हा दाखल केलाय. या दोघांनाही अटक करण्यात आलं असल्याची माहिती पोलिस निरीक्षक महेश ढवाण यांनी दिली.

# भारतात फिरण्यासाठी आलेल्या अमेरिकन तरुणीनं रचली अपहरणाची खोटी कहाणी, पोलिसांनी 24 तासांत सोडवलं प्रकरण, नक्की काय घडलं?

भारतात पर्यटनसाठी आलेल्या अमेरिकन तरुणीच्याअपहरणाची माहिती मिळताच खळबळ माजली, यानंतर दिल्ली पोलिसांनी यंत्रणा कामाला लावली. दिल्ली पोलिसांनी अवघ्या 24 तासांत शर्थीचे प्रयत्न करत तरुणीचा शोध लावला. पण जेव्हा तरुणी सापडली तेव्हा खरी हकीकत समोर आली आणि सर्वांनाच मोठा धक्का बसला. या तरुणीचं अपहरण झालंच नव्हतं, तर तिने तिच्या नायजेरियन मित्रासोबत मिळून ही सर्व खोटी कहाणी रचली होती.

अमेरिकन तरुणीनं रचली अपहरणाची खोटी कहाणी

नवी दिल्ली पोलीस उपायुक्त अमृता गुगुलोथ यांनी दिलेल्या माहितीनुसार, कोले रेनी नावाची अमेरिकन तरुणी 03 मे रोजी नवी दिल्लीतील विमानतळावर उतरली. त्यानंतर दोन महिने ती पर्यटन करत देशभर फिरली. पण 09 जुलै रोजी कोल रेनीने अमेरिकन सिटिझन सर्व्हिसला ईमेल करत मदत मागितले आणि सांगतले की भारतात तिला मानसिक आणि शारीरिक त्रास दिला जात आहे. या ईमेलमध्ये अधिक माहिती नव्हती.

यादरम्यान, कोलने 10 जुलै रोजी अमेरिकेत राहणाऱ्या पालकांशी व्हॉट्सअॅप कॉलवर संपर्क साधला. तिने व्हॉट्सअॅपवर व्हिडीओ कॉलमध्ये आईला तिच्या शरीरावर जखमेच्या खुणा दाखवल्या. तिने आईला सांगितले की काही लोकांनी तिला मारहाणही केली. मात्र, तिला कुठे ठेवले होते, हे सांगितले नाही. कॉल सुरू



असताना काही लोक मुलीच्या खोलीत आले, त्यानंतर कोले यांनी फोन ठेवून दिला. त्यानंतर तिचा कुटुंबाशी संपर्क झाला नाही. चार-पाच दिवस उलटून गेल्यावर मुलीच्या आईने अमेरिकन सिटिझन सर्व्हिसशी संपर्क साधून संपूर्ण माहिती दिली. त्यानंतर त्याची माहिती नवी दिल्लीतील अमेरिकन दूतावासाला देण्यात आली. अमेरिकन दूतावासाने अमेरिकन तरुणीच्या बेपत्ता झाल्याची तक्रार चाणक्यपुरी पोलीस ठाण्यात दिली. ज्यानंतर अपहरणाच्या कलमाखाली एफआयआर नोंदवून तरुणीचा शोध सुरू झाला.

असा लागला अमेरिकन तरुणीचा शोध

पोलीस उपायुक्त अमृता गुगुलोथ यांनी सांगितलं की, चाणक्यपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्यानंतर अनेक पथकं तयार करण्यात आली आणि तरुणीचा शोध सुरू झाला. आधी पोलिसांनी Yahoo.com वरून ईमेल सिस्टमचा IP अॅड्रेस शोधला. तसेच कोलेने तिच्या आईला ज्या मोबाईलवरून फोन केला होता तो मोबाईल ट्रेस करण्याचाही प्रयत्न करण्यात आला. याशिवाय, कोलेने भारतात आल्यावर भरलेल्या इमिग्रेशन फॉर्ममधून माहिती गोळा करण्यात आली. इमिग्रेशन फॉर्ममध्ये तिने ग्रेटर नोएडा येथील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये राहण्याची माहिती दिली होती, पण जेव्हा टीमने हॉटेलमध्ये जाऊन चौकशी केली तेव्हा ती तिथे पोहोचली नसल्याचं समजलं. पोलिसांनी बाबींचा शोध घेतल्यानंतर कोलेच्या मित्राचा नंबर सापडला. त्याआधारे पोलिसांनी गुरुग्राम गाठले. तेथून नायजेरियन नागरिक रिचीसोबत विचारपूस करण्यात आली. रिचीने दिलेल्या पत्त्यावर कोले सापडली.

'या' कारणासाठी रचली खोटी कहाणी

पोलिसांनी कोले सापडल्यानंतर त्यांनी तिला विचारणा केली असता, कोलेने अपहरणाची खोटी कहाणी रचण्यामागचं कारण सांगितलं. कोलेने आईवडिलांना भावनिक ब्लॅकमेल करण्यासाठी अपहरणाची खोटी कहाणी रचली.

# गारबर्डी धरणावर अडकलेल्या 9 पर्यटकांची सुटका, ग्रामस्थ आणि प्रशासनाने तरुणांना सुखरुप बाहेर काढले

रावेर : तालुक्यातील गारबर्डी येथील सुकी नदीवरील धरणा वर अडकलेल्या 9 पर्यटकां ची सुखरुप सुटका करण्यात आली आहे. अडकलेले सर्व पर्यटक पिकनिकसाठी धरणावर आले होते. मात्र धरण ओव्हरफ्लो झाल्याने हे सर्व जण धरणावर अडकून पडले. पर्यटक अडकल्याची माहिती मिळताच रावेर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तहसीलदारांनी बचाव पथकाला प्रचारण केले होते. बचाव पथकाने रेस्क्यू ऑपरेशन राबवत अडकलेल्या सर्वांची सुटका केली. स्थानिक ग्रामस्थ आणि पोलीस प्रशासन, महसूल प्रशासनाने अडकलेल्या 9 जणांना सुखरूप बाहेर काढले. सर्व पर्यटक हे मुक्ताईनगर तालुक्यातील आहेत.

**तरुण नदीच्या मधोमध अडकले होते**

जळगाव जिल्ह्यातील रावेर तालुक्यातील सुखी (गारबर्डी) धरणाचा वेस्ट



वेअर ओसंडून वाहत आहे. या जलप्रवाहाच्या विळख्यात 9 पर्यटक अडकल्याची माहिती सायंकाळी 6.30 वाजता स्थानिकांनी प्रशासनाला दिली. हे नऊ पर्यटक नदीच्या मधोमध उभे असून पाण्याचा वेढा त्यांच्या दोन्ही बाजूने पडला आहे. तसेच पाण्याचा प्रवाह वाढतच असल्याने हे सर्व जण वाहून जाण्याची भीती व्यक्त केली जात होती. याबाबतची माहिती पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता बेहरे, सावदा येथील उपविभागीय अभियंता यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाला देऊन बचाव कार्य तातडीने उपलब्ध करून देण्याची विनंती केली. याबाबतची माहिती जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांना मिळताच त्यांनी फैजपूर चे प्रांताधिकारी कैलास कडलग आणि रावेरच्या तहसिलदार उषाराणी देवगुणे यांना बचाव साहित्यासह घटनास्थळी पोहोचण्याचे निर्देश दिले. त्याचबरोबर सतत सुरू असलेला पाऊस तसेच नदीपात्रात वाढत जाणारे पाणी ही बाब लक्षात घेऊन निवासी उपजिल्हाधिकारी राहुल पाटील यांनी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची मदत मिळण्यासाठी मंत्रालयातील आपत्ती निवारण कक्षास संपर्क साधण्यात आला. त्यानुसार धुळे येथील राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची तुकडीही घटनास्थळाकडे रवाना झाली.

**गुरख्याने पर्यटक अडकल्याचे पाहिल्यानंतर प्रशासनाला माहिती दिली**

सुकी नदीवरील हे पाल वनविभागात असून सध्या वनक्षेत्रात चांगल्या प्रकारे पाऊस होत असल्यामुळे गारबर्डी धरण ओव्हरफ्लो झाले आहे. त्यामुळे पर्यटन वर्ग या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जात असतात. असेच पर्यटनासाठी गेलेले 9 पर्यटक अडकून पडले होते. मात्र गुरख्याला हे पर्यटन अडकल्याचे दिसून आले. ग्रामस्थांच्या मदतीने याबाबत स्थानिक प्रशासनाला ही माहिती देण्यात आली. घटनास्थळी तात्काळ स्थानिक प्रशासन आणि मच्छीमारांच्या मदतीने पर्यटकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. संतोष दरबार राठोड, इम्रान शाह इकबाल शाह, रतन भंगी बारेला, दारासिंग रेवाल सिंग, गोविंदा चौधरी, सिकंदर गुलजार यांनी अडकलेल्या पर्यटकांची सुटका केली. यासाठी त्यांना स्थानिक आमदार शिरीष चौधरी, रावेर तहसील कार्यालय, सावदा पोलीस स्टेशन, प्रांत कार्यालय फैजपूर, वन्यजीव अधिकारी व कर्मचारी आदीचे सहकार्य लाभले.

**सुटका करण्यात आलेल्या पर्यटकांची नावे**

1. गणेश पोपतसिंग मोरे (28 एकनाथ नगर मुक्ताईनगर)
2. आकाश रमेश धांडे (24 रा.एकनाथ नगर मुक्ताईनगर)
3. पियुष मिलिंद भालेराव (23 एकनाथ नगर मुक्ताईनगर)
4. जितेंद्र शत्रूंग पुंड (30 रा. चिखली ता. मुक्ताईनगर)
5. मुकेश श्रीराम धाडे (19 रा.एकनाथ नगर मुक्ताईनगर)
6. लखन प्रकाश सोनवणे (25 रा.एकनाथ नगर मुक्ताईनगर)
7. अतुल प्रकाश कोळी (22 रा.एकनाथ नगर मुक्ताईनगर)
8. विष्णू दिलीप बोरसे (19 रा. एकनाथ नगर मुक्ताईनगर)
9. रमेश सोनवणे (24 रा. एकनाथ नगर मुक्ताईनगर)

# सतरंज्या विकायला आलेल्यांचा मंगळसूत्रावर डल्ला, औरंगाबादेत मध्य प्रदेशातून आलेल्या दोघांना अटक



औरंगाबादः शहरात सतरंज्या विकण्यासाठी आलेल्या दोघांनी महिलांच्या गळयातील मंगळसूत्रांवर डल्ला मारला. सनिवारी रात्रीपासून रविवारी सकाळपर्यंत शहरातील रस्त्यांवर फिरणाऱ्या या दोघांनी तीन मंगळसूत्र चोरली. उस्मानपुऱ्यातील भाजीवाली बाईचा पुतळा, पुंडलिक नगर आणि नागेश्वरवाडी येथून तीन महिलांच्या गळयातील मंगळसूत्र हिसकावले. या घटना सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाल्या. शहरातील गुन्हे शाखेच्या पोलिसांनी या दोघांचा माग काढत त्यांना पकडले. मोंढा नाका परिसरातील लॉजमधून त्यांचा मोबाइल नंबर मिळाल्यानंतर पोलिसांनी पाठलाग करत त्यांना दौलताबाद किल्ल्याच्या पुढे पकडले. पोलिसांनी रचलेल्या सापळयात अडकल्यानंतर या दोघांनीही गुन्ह्याची कबूली दिली. त्यांच्याकडून एक दुचाकी, सतरंज्या, चोरलेले तीन मंगळसूत्र आदी 03 लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

असे अडकले जाळयात...

गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक अमोल म्हस्के यांचे पथक रविवारी सकाळपासून चोरांचा शोध घेत होते. कारण आठ तासात तीन मंगळसूत्रांची चोरी झाली होती. शहरातील परिसर पिंजून काढल्यानंतरही चोरटे सापडले नसल्याने सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. मोंढा नाका उड्डाणपुलाच्या खाली एका दारूच्या दुकानाजवळच्या सीसीटीव्हीमध्ये चोरटे आढळले. त्या दुकानाच्या पाठीमागील भागात एका लॉजमध्ये जाऊन चौकशी केली असता काही वेळापूर्वीच या लोकांनी चेकआऊट केल्याचे कळले. तसेच मध्यप्रदेशातून हे लोक चादरी विकण्यासाठी तीन दिवसांपूर्वी शहरात आल्याचीही माहिती मिळाली. लॉजवर नोंदवलेल्या मोबाइल क्रमांकावरून हे लोक दौलताबाद किल्ल्याच्या परिसरात पोहोचल्याची माहिती मिळाली.

किल्ल्याच्या परिसरात सापळा

शहरातील गुन्हे शाखेच्या पथकाने चोरट्यांना पकडण्यासाठी स्वतंत्र पथके तैनात केली.

## संपादकीय...



# लोकांच्या खिशाला कात्री

कोणत्याही व्यवस्थात्मक रचनेमध्ये मध्यमवर्गाची अवस्था ही `गरीब बिचारी कुणीही हाका... अशीच असते. हा वर्ग सर्वसामान्यांसारखा रस्त्यावर उतरून आपल्या आशा-अपेक्षांसाठी आंदोलने किंवा निदर्शने करण्याच्या फंदात पडत नाही. व्यवस्थेच्या उच्चपदस्थात त्याची बाजू लावून धरणारेही फारसे कोणी नसते. त्यामुळे त्याच्या जगण्याची असते ती वाऱ्यावरची वरात. वस्तू सेवा कराची (जीएसटी) कार्यवाही सुरू झाल्यापासून त्याचा परिघ चंद्राच्या कलेकलेप्रमाणे विस्तारत आहे. तो जितका व्यापक होतो आहे, तसतसे माणसाच्या जगण्यासाठी आवश्यक, गरजेच्या आणि नित्याच्या वस्तूंवर जीएसटीचा अंकुश येत आहे. परिणामी, त्याचे जगणे महाग होते आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली गेल्या महिन्यात झालेल्या जीएसटी परिषदेच्या ४७ व्या बैठकीत ठरल्याप्रमाणे अनेक जीवनावश्यक घटक जीएसटीच्या परिघात आणले गेले. त्याची कार्यवाही सोमवारपासून, ता. १८ जुलैपासून सुरू झाली. सरकारच्या सुदृढ अर्थकारणासाठी कराची मात्रा आवश्यक असली तरी सामान्यांच्या पोटाला अनाठायी चिमटा बसत असेल, तर त्याचा गांभीर्याने विचार, प्रसंगी फेरविचारही करायचा असतो.

दही, दूध, लस्सी, पनीर, गहू, तांदूळ, विविध पिठे, धान्ये, गूळ, उकडा तांदूळ अशा कितीतरी वस्तू 'जीएसटी'च्या या नव्या जाळयात आल्या आहेत. शिवाय, रुग्णालयात पाच हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेची किंवा हॉटेलमध्ये एक हजार रुपयांहून कमी रकमेची खोली घेतली तरी त्यावर जीएसटीची आकारणी होईल. अपारंपरिक ऊर्जेच्या वापराला, प्रसाराला सरकार प्रोत्साहन देत आहे. मात्र, सौरऊर्जेवरील हिटरही महाग होणार आहे. छपाईसह लेखनसामग्री, पेन्सिल, त्याला टोक करायचे साधन, रेखांकन, चिन्हांकन साधने, नकाशे, तक्त`यांनाही जीएसटीच्या झळा बसत आहेत. अन्नधान्याच्या २५ किलो किंवा २५ लीटरखालील ब्रँडेड, पॅकेजिंगवर `जीएसटी'चा बोजा असेल, त्यापेक्षा अधिक वजन किंवा लीटरच्या पॅकिंगला मात्र यातून वगळले आहे. वेगवेगळया प्रकारच्या पंपांवरील जीएसटीही बारावरून १८ टक्के केला आहे. त्यामानाने सवलतीच्या किंवा दिलासादायक बाबी विरळा आहेत. अपवाद काही वाहतूकसुविधांचा. थोडक्यात, नमूद वजन किंवा वस्तुमानाच्या ब्रँडेड, पॅकिंग केलेल्या, वेष्टनांकित वस्तूंची खरेदी करणारा वर्ग हा सामान्यतः निम्न मध्यमवर्गीय ते उच्च मध्यमवर्गीय घटकातील असतो. जीएसटीचे हे जाळे अतिशय कुशलतेने विणलेले आहे. त्यात मध्यमवर्गीय मोठ्या प्रमाणात अलगद ओढला जातो आहे. त्याचे महिन्याचे स्वयंपाकघरातील नियोजनच यावेळच्या करांनी कोलमडणार आहे. युद्ध, कोविड व हवामान बदल यासारख्या एका पाठोपाठ एक संकटांनी आधीच महागाईचा आलेख चढा झालेला असताना खिशाला जीएसटीची मोठी कात्री लागणार आहे. जूनमध्ये आपला चलनवाढीचा दर ७.०१ टक्के होता, तोच मेमध्ये ७.०४ टक्के होता. मेमध्ये आठ वर्षातील तो उच्चांकी, ७.७९ टक्क्यांवर पोहोचला होता. त्यावेळी उन्हाच्या तडाख्याने हैराण जनता चलनवाढीने मेटाकुटीला येवून धापा टाकत होती. इंधनाच्या किंमती टिपेला पोहोचल्या होत्या. महाराष्ट्रातील नव्या सत्ताधाऱ्यांनी मूल्यवर्धित कराबाबत (व्हॅट) निर्णय घेवून, इंधनदरवाढीला आळा घालून दिलासा दिला, ही समाधानाची बाब. जीएसटीच्या संकलनातून सरकारची तिजोरी अधिक समृद्ध होत आहे. एप्रिलमध्ये एक लाख ६७ हजार कोटी, मेमध्ये एक लाख ४० हजार कोटी आणि जूनमध्ये एक कोटी ४४ हजार कोटी रुपयांवर जीएसटीचे संकलन पोहोचले आहे. या जूनमधील संकलन गेल्यावर्षीच्या जूनपेक्षा तब्बल ५५ टक्क्यांहून अधिक आहे. २०२१ मध्ये जीएसटीचे संकलन ११लाख ३७हजार कोटी होते, ते २०२२ मध्ये १४लाख ८३हजार कोटी आणि २०२३ मध्ये १७लाख ४०हजार कोटींवर पोहोचेल, असा सरकारचा अंदाज आहे. ज्यांच्यासाठी करसंकलनाची कोटीच्या कोटी उड्डाणे होत आहेत, त्यांच्याच खिशाला किती कात्री लावायची याचा विचारही सरकारने करावा. गेल्या काही महिन्यात चलनवाढ, परकी चलनाची घटती गंगाजळी, डॉलरच्या तुलनेत कमकुवत होणारा रुपया, त्याने सोमवारी डॉलरला ऐंशी रुपयांपर्यंत गाठलेला तळ या चिंतेच्या बाबी आहेत. चलनवाढ अधिक तीव्र होईल, पुढील वर्षी मंदी येईल, अशी भीती तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. या पार्श्वभूमीवर भरडला जाणारा घटक हा सामान्य मध्यमवर्गीय करदाताच असतो. जीएसटी ही अप्रत्यक्ष करातील मोठी सुधारणा आहे, असे म्हटले गेले. सर्वच वस्तू व सेवांवर हा कर लागू होणार हे जरी अपेक्षित असले तरी सुरवातीला ज्या वस्तू नित्याच्या वापरातील म्हणून वगळल्या होत्या, त्यांना कराच्या कक्षेत आणताना त्याच्या अंमलबजावणीची वेळ चुकते आहे.

# 'अग्निपथ'मागे सत्ताकांक्षी हिशेब?



'अग्निवीर', 'अग्निपथ' हे शौर्यसूचक शब्द. परंतु, प्रत्यक्षातील अर्थ विघातक. भारतीय लष्कराला कमकुवत करणारा. देशाचे रक्षण करणाऱ्या पेशाचे कंत्राटीकरण करणारा. संरक्षणाच्या बाबतीत मोदी सरकारचा प्रवास 'वन रँक वन पेन्शन'पासून 'नो रँक नो पेन्शन'पर्यंत झाला. राजकारणाचे कार्पोरेटीकरण इथेच थांबत नाही. ते लष्कराला वेढू पाहत आहे. २०१४ मध्ये हे सरकार आल्यापासून गांधी-नेहरूंचा वारसा असणाऱ्या प्रत्येक संस्थेची मोडतोड सुरू आहे. नियोजन मंडळाच्या जागी निती आयोग आला. देशाच्या विकता येईल, अशा संपत्तीची यादी तयार करणे हेच जणू प्रमुख काम. रेल्वेचा स्वतंत्र अर्थसंकल्प मुख्य अर्थसंकल्पात अंतर्भूत करण्यात आला. रेल्वेच्या खासगीकरणाची दिशा सूचित करणारा हा बदल होता. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नर पदावर इतिहासाच्या पदवीधराची नियुक्ती करण्यात आली. या शक्तिकांत दास यांच्या आर्थिक ज्ञानाचे दर्शन नोटाबंदीच्या काळात घडले.

संसद भवनाची इमारत भले इंग्रजांनी बांधली; परंतु स्वातंत्र्याच्या इतिहासाची, सत्तांतराची ती साक्ष ठरली. ऐन महासाथीत देशात औषधे व प्राणवायूअभावी लाखो लोक मृत्युमुखी पडले. त्यांच्यासाठी सर्व शक्ती एकवटण्याऐवजी २० हजार कोटी रुपयांचा 'सेंट्रल व्हिस्टा' प्रकल्प रेटण्यात आला.

राजपथावरील 'अमर जवान ज्योत' हलविण्यात आली. देशासाठी प्राणार्पण करण्यासाठी तयार असलेल्या लष्कराविषयी राज्यकर्त्यांच्या मनात किती आदरभाव आहे, हे यातून दिसून आले. डॉ. मनमोहन सिंग सरकारच्या काळातील राफेल व्यवहारात तयार विमाने, त्यांचे तंत्रज्ञान व देशात निर्मितीची तरतूद असताना स्वतः पंतप्रधानांनी हस्तक्षेप करून फक्त ३६ तयार विमाने अधिक भावात खरेदी केली. गलवानमध्ये चीनच्या आक्रमणात २० जवान हुतात्मा झाले असताना 'देशाची सीमा ओलांडून कोणी आलेले नाही,' असे धडधडीत असत्य विधान करण्यात आले. चीनने हजार चौरस किलोमीटर टापू बळकावून अरुणाचल प्रदेशात गावे वसविली; परंतु त्याचा उच्चारही कधी झाला नाही. 'सैनिकांपेक्षा व्यापारी अधिक धोका पत्करतो,' असे विधान जाहीरपणे करणाऱ्यांकडून लष्कराने खरे तर अपेक्षा ठेवायला नको.

'लष्करापेक्षा आमचे स्वयंसेवक तीन दिवसांत सीमेवर जायला तयार होऊ शकतात,' असे वक्तव्य करणाऱ्यांच्या सावलीत बसणाऱ्यांना 'लष्कराचा त्याग, समर्पण, निष्ठा, हौतात्म्य' याची जाणीव कितपत असेल?

आपले संरक्षणमंत्री, लष्करप्रमुख एकाच वेळी दोन्ही सीमांवर लढण्यासाठी लष्कराने सज्ज राहावे, असे सांगत असतात; परंतु प्रत्यक्षात संरक्षण दलांना कमकुवत करणारी 'अग्निपथ', 'अग्निवीर' योजना रेटतात. संरक्षण क्षेत्रात कंत्राटी सेवा ही कल्पनाच घातक आहे. जम्मू-काश्मीरमध्ये लष्कराचे एक तृतीयांश जवान गेली तीन दशके अडकून पडले आहेत. काही हजार कोटींच्या बचतीसाठी नव्या योजनेद्वारे देशाच्या सुरक्षेशी तडजोड केली जात आहे. २०२०-२१मध्ये लष्कराच्या निवृत्तिवेतनावर एक लाख ३३ हजार कोटी रुपये खर्च झाले. लष्कराच्या आधुनिकीकरणासाठी नवे तंत्रज्ञान नवी शस्त्रे यासाठी संरक्षण खात्याकडे पुरेसा निधी राहत नाही, असे सांगितले जाते. मोदी सरकारने कॉर्पोरेट करात दीड लाख कोटी रुपयांनी कपात केली. तरीही अर्थव्यवस्था सावरण्यात मदत झाली नाहीच.

'कॉर्पोरेट संस्कृती' घातक

सैनिकांचा पेशा हा इतर नोकऱ्यांपेक्षा खूप वेगळा आहे. त्यात युद्धात, दहशतवाद्यांशी लढताना सैनिकाला आपले प्राण त्यागावे लागतात. हे सर्वोच्च बलिदान असते. त्याची किंमत पैशांत केवळ व्यापारी मनोवृत्तीच करू शकते. सैनिकाला निवृत्तिवेतन हा काही हजारांचा मुद्दा नाही. वृद्धापकाळाचा तो आधार असतो. त्याचा आत्मसन्मान जपण्यासाठी तो गरजेचा असतो. निवृत्तिवेतनामुळे तो त्याच्या कुटुंबावर ओझे ठरणार नाही, याची हमी त्याला मिळते. सर्वसामान्य सैनिक चाळिशीत निवृत्त होत असला, तरी त्यांच्यातील फक्त १.६ टक्के लोकांनाच नव्या नोकऱ्या मिळतात. 'अग्निवीर' योजना सामान्य सैनिकांसाठीच आहे. अधिकारी वर्गासाठी ती लागू नाही. काही 'मार्शल रेसेस'ची परंपरा वगळता सैनिक म्हणून भरती होणाऱ्यांत ७० टक्के ग्रामीण भागांतील अल्पभूधारक, भूमिहीन गरिबांचीच मुले असतात. युद्धात त्यांना हौतात्म्य येते, तेव्हा तेवढ्यापुरता गौरव होतो. नंतरच्या लाभांसाठी त्यांच्या कुटुंबांना नेते, सरकारी अधिकाऱ्यांचे उंबरठे झिजवावे लागतात. लष्कराच्या नोकरीत निवृत्तिवेतनाची, सामाजिक सुरक्षेची हमी असते. कल्याणकारी राज्याच्या कल्पनेशी हे सुसंगत आहे. लष्करात कॉर्पोरेट संस्कृती आणण्याचा आणि ती लादण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना सैनिकांच्या जीवनाशी भिडल्याशिवाय वास्तव कळणार नाही. कॉर्पोरेट क्षेत्रात 'धन्यवादाची संस्कृती' आहे. व्यवस्थापनाला हवे तेव्हा आपल्या कर्मचाऱ्याला 'धन्यवाद' म्हणत बाहेर घालविण्याची मुभा असते. 'अग्निपथ' योजना ही संरक्षण दलांतील स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी सुधारणा आहे. लष्कराच्या लढाऊ क्षमतेवर त्याचा परिणाम होणार नाही, असे काही सेनाधिकारी छातीठोकपणे सांगतात. चार वर्षांनंतर ७५ टक्के जवानांची गच्छंती निश्चित. उरलेल्या २५ टक्क्यांतीलही सर्वांना कायम ठेवण्यात येणार नाही. २५ टक्क्यांपेक्षा हे प्रमाण कितीही खाली येऊ शकते. काढण्यात आलेल्यांसाठी काही योजना सांगण्यात येत असल्या, तरी त्यांना कायद्याचे बंधन नाही.

ही सरकारची योजना, त्याबाबतचे खुलासे संबंधित मंत्री, सरकारने करणे अपेक्षित. त्याऐवजी सेनाधिकाऱ्यांना पुढे केले जात आहे. सेवेत असताना सरकारी योजनेला जाहीर विरोध करण्याची त्यांची हिंमत होणार नाही. अनेक निवृत्त सेनाधिकारी मोदी सरकारच्या आठ वर्षांतील अनेक वादग्रस्त धोरणांवर पुस्तके लिहून वा पत्रके काढून टीका करताना दिसतात. त्यांना त्यांची सदसद्विवेकबुद्धी तशी प्रेरणा देते. भविष्यात निवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांची तोंडे बंद करण्यासाठी सरकारी निर्णय, धोरणांवर टीका करणार नाहीत, अशी हमीपत्रे निवृत्तीपूर्वीच घेण्याचाही प्रयत्न होण्याची भीती व्यक्त होत आहे.

सीडीएसचा उलटा प्रवास

१९८९मध्ये राजीव गांधींच्या सरकारमध्ये संरक्षण खात्याची जबाबदारी संरक्षण राज्यमंत्री अरुणसिंग यांच्याकडे होती. लष्करात चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) पद नेमावे का, यावर बराच खल झाला. त्यानंतरच्या कुठल्याही सरकारने सीडीएस नेमला नाही. मोदी सरकारने त्यांच्या राजकीय भूमिकेला सुसंगत अशी भूमिका घेणाऱ्या जनरल बिपिन रावत यांना ते लष्करप्रमुख म्हणून निवृत्त झाल्यावर सीडीएस म्हणून नेमले. त्यांच्या अपघाती निधनानंतर सहा-सात महिने झाल्यानंतरही नवी नियुक्ती झाली नाही. त्याऐवजी सरकारने ऐन वेळी सीडीएसच्या निवडीचे निकष बदलले. जनरल रावत यांना सीडीएस होऊनही 'फोर स्टार' रँक होती. आता सीडीएस निवृत्त झालेले, 'थ्री स्टार' असलेले जनरल वा हवाई दल, नौदलातील समकक्ष अधिकारी नेमता येणार आहे. हा उलटा प्रवास कशाला? यातून ज्येष्ठतेचे उल्लंघन तर होईलच; पण त्यातून वरच्या श्रेणीतील अधिकाऱ्यांमध्ये नाराजी उद्भवणार. इच्छुकांमध्ये सरकारची मर्जी राखणाऱ्यांची एक फळी उभी राहील. सेनेच्या तिन्ही विभागांतील समन्वयाऐवजी त्यांच्यात ईर्षा, स्पर्धा व कटुताच निर्माण होईल. लष्कराला मुठीत ठेवण्याची गरज सुप्त भय आणि असुरक्षिततेतून निर्माण होते. भारतातील लोकशाही व्यवस्थेप्रमाणे कोणत्याही सरकारला घटनेच्या चौकटीत पाच वर्षे मालक म्हणून नव्हे, तर देशातील जनतेचे सेवक म्हणूनच काम करण्याचे बंधन आहे; परंतु पाशवी बहुमताच्या जोरावर मनमानी सुरू आहे. नोटाबंदीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेचे महासाथीआधीच कंबरडे मोडले होते. भूसंपादन, सुधारित नागरिकत्व कायदा (सीएए), एनआरसी, कृषी कायदे अशी अनेक विधेयके रेटण्यात आली. संसदेत संमत होणाऱ्या कायद्यांची पुरेशी छाननी होत नाही, अशी तक्रार खुद्द विद्यमान सरन्यायाधीश रमण यांनीच केली होती. देशातील जनमत, संसदेतील विरोधी पक्ष यांना झिडकारून बहुमताच्या जोरावर विधेयके संमत होतातही; परंतु प्रतिकारानंतर कृषी कायदे मागे घ्यावे लागले. राष्ट्रवाद, राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाने आकर्षक आश्वासने देऊन सरकारी मालमत्तांच्या खासगीकरणाचा मार्ग खुला करण्यात आला.

'अग्निपथ'नंतर संरक्षण खात्याकडील १७ लाख ९५ हजार एकर जमिनीचा मुद्दा ऐरणीवर येणार आहे. लष्कराच्या ६२ कॅन्टोन्मेंटच्या बाहेरील १६ लाख ३५ हजार एकर जमिनींचा लिलाव करण्याचा प्रस्ताव संसदेच्या आगामी अधिवेशनात येणार आहे. ड्रोनद्वारे या जमिनींचे सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. अवकाश संशोधन संस्थेत खासगी उद्योगांचा चंचुप्रवेश झालाच आहे. लष्कराशी संबंधित संस्थांच्या खासगीकरणाचा विचारही सुरू आहे. लष्कराच्या 'बेस वर्कशॉप'चे कामही खासगी कंपन्यांकडे सोपविले जाण्याची शक्यता आहे. देशातील महत्त्वाचे विमानतळ, बंदरे, रेल्वे, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, बँका यांच्या खासगीकरणाच्या प्रेरणा व लाभ कुठून येतात, हे देशाने वेळीच ओळखले पाहिजे.

'अग्निपथ', 'अग्निवीर' या योजनेमागील विचार नेमका कुणाचा आहे,

• • •

## पोलीस सब इन्स्पेक्टरला बलात्काराच्या आरोपाखाली अटक, नागपुरात खळबळ, नेमकं काय प्रकरण?

नागपूर : नागपूरमध्ये चक्क एका पोलिसावरच बलात्काराचा आरोप करण्यात आला आहे.

बलात्काराच्या आरोपाखाली या पोलिसाला अटकही करण्यात आली असून प्रदीप कुमार नितवने असं या पोलिसाचं नाव आहे.

पोलिस सब इन्स्पेक्टर पदावर काम करणाऱ्या प्रदीपवर बलात्काराचा असा आरोप करण्यात आला आहेय. याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या प्रदीप कुमार नितवने याला पाच दिवसांची पोलीस कोठडीही सुनावण्यात आली आहे. नात्यातीलच मुलीवर बलात्कार नात्यातीलच असलेल्या 17 वर्षांच्या मुलीवर प्रदीपने बलात्कार केला. या मुलीला घेऊन प्रदीप कुमार




नितवने चिखलदऱ्याला गेला. तिथे नेवून या मुलीवर त्याने बलात्कार केला, असा आरोप करण्यात आला आहे. ही मुलगी इयत्ता बारावीची विद्यार्थीनी आहे. ती नागपुरात पेईंग गेस्ट म्हणून राहत होती.

बलात्काराच्या या घटनेनं नागपुरात खळबळ उडाली आहे. पीडित विद्यार्थीनी मूळची सावनेरची असल्याचीही माहिती समोर आली आहे. दरम्यान, पोलिसांत दाखल झालेल्या तक्रारीनुसार सिताबर्डी पोलिसांनी याप्रकरणी संशयित आरोपी पोलीस उपनिरीक्षक असलेल्या प्रदीप कुमार नितवने याला बेड्या ठोकल्यात. सध्या प्रदीपची पोलीस कसून चौकशी करत आहेत.

नेमकं काय घडलं?

प्रदीपकुमान नितवने हा मुलीला फूस लावून चिखलदरा इथं घेऊन गेला होता. कारने तो बारावीत शिकणाऱ्या विद्यार्थीनीला घेऊन गेला. तिथे पोहोचल्यानंतर त्याने तिला काही संशयास्पद गोष्ट प्यायला दिली. यानंतर शुद्ध हरपलेल्या अवस्थेत गेलेल्या मुलीवर प्रदीपने अतिप्रसंग केला. अल्पवयीन मुलीचं लैंगिक शोषण केल्यानंतर प्रदीपने मुलीला जीवे मारण्याची धमकीही दिली. झालेला प्रसंग कुणाला सांगितला तर तुझी खैर नाही, असं म्हणत पीडितेला धमकावण्यात आलं होतं. दरम्यान, पीडितेनं आपल्या पालकांना घडलेली हकीकत सांगितल्यानंतर अखेर सीताबर्डी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. त्यानंतर आरोपी पीएसआयला अटक करण्यात आली आहे.

गंभीर गुन्हा दाखल झाल्यानंतर संपूर्ण नागपूर पोलीस दलाच एकच खळबळ माजली आहे. 35 वर्षीय प्रदीपने एक अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याचा आरोप करण्यात आला असून याप्रकरणी प्रदीप याला अटकही करण्यात आली आहे. 17 वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर प्रदीपने 13 जुलैला चिखलदरा येथे बलात्कार केला,

## नवरा पाहिजेल तर पाच लाख दे, पत्नीकडून खंडणी मागणाऱ्या आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

डोंबिवली : पैसे परत करत नसल्याने एका व्यक्तीला डांबून ठेवत त्याच्या पत्नीकडे 5 लाख रुपयाची खंडणी मागणाऱ्या खंडणीखोराला डोंबिवलीतील टिळक नगर पोलिसांनी अटक केली आहे.

अतुल व्यापारी असे सुटका करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव आहे. तर अजय जाधव असे खंडणी मागणाऱ्या आरोपीचे नाव आहे. एका व्यवहारात अजयने दिलेले 2 लाख 80 हजार रुपये अतुल व्यापारी हे परत करत नसल्याने त्यांचे अपहरण करून मारहाण केली.

अजय जाधव हा रेल्वेत मॅकेनिक आहे. खंडणी मागितल्याप्रकरणी व्यापारी यांच्या पत्नीने टिळक नगर पोलिसात तक्रार दाखल केली होती.

तक्रारीनंतर पोलिसांनी सापळा रचून खंडणी मागणाऱ्या आरोपीला रंगेहाथ पकडून अतुल यांची सुखरूप सुटका केली आहे.

अपहरण करून रेल्वे वसाहतीतील डांबले

आरोपीने व्यापारी यांचे अपहरण करून त्यांना 8 दिवस स्वतःच्या माटुंगा येथील रेल्वे कॉलनीतील घरात डांबून ठेवले होते. त्यांच्या सुटकेसाठी पत्नीकडे 5 लाख रुपयांची खंडणी मागितली. डोंबिवलीत राहणारे अतुल व्यापारी हे बँकेतून कर्ज पास करून देणे, व्याजाने पैसे देणे यांसारखे व्यवहार करतात. रेल्वे मध्ये मेकॅनिक म्हणून काम करणाऱ्या अजयने 2021 मध्ये अतुल यांच्यासोबत एक व्यवहार केला होता. त्यासाठी 2 लाख 80 हजार रुपये त्याने अतुलला दिले होते. मात्र पैसे परत देत



नसल्याने अजय याने अतुल डोंबिवलीत 9 जुलै रोजी भेटण्यासाठी बोलावले. त्यानंतर त्यांना मारहाण करून त्यांचे अपहरण करत त्यांना माटुंगा येथील रेल्वे वसाहतीतील घरात डांबून ठेवले. पुढे अतुल यांची पत्नी ऋचा यांच्या फोनवर नवरा हवा तर 5 लाख रुपये दे अशी मागणी केली. ऋचा यांनी 3 लाख रुपये देण्याची तयारी दाखविली. मात्र अजय 5 लाखावर अडून बसल्याने अखेर शुक्रवारी तिने टिळकनगर पोलीस ठाण्यात धाव घेत पतीचे अपहरण झाल्याची तक्रार दाखल केली.

खंडणीचे पैसे घेताना पोलिसांनी रंगेहाथ पकडले तक्रार दाखल होताच टिळकनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय आफळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग पिठे, पोलीस नाईक जाधव, घुगे, महाजन, चंदने यांच्या पथकाने अतुल यांचा शोध सुरू केला. ऋचा यांनी 5 लाख घेण्यासाठी अजयला डोंबिवली पूर्वेतील फडके रोडवरील एका हॉटेलमध्ये बोलावले. या हॉटेलात पोलिसांनी सापळा लावत खंडणीचे पैसे घेत असलेल्या अजयला रंगेहाथ पकडून अतुलची सुटका केली. त्यानंतर पत्नीच्या व अतुलच्या फिर्यादीनंतर अजयला बेड्या ठोकत कल्याण सत्र न्यायालयात हजर केले. रविवारी कल्याण जिल्हा सत्र न्यायालयाने अजयला 20 जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## घटस्फोटानंतरही मुलांचा संपत्तीवरील हक्क कायम; गुजरात हायकोर्टाचा मोठा निर्णय

नवी दिल्ली : वडिलांच्या संपत्तीवरील हक्काबाबत गुजरात उच्च न्यायालया ने एक महत्वपूर्ण निकाल दिला आहे. पती-पत्नीचा घटस्फोट झाला तरीही मुलांचा वडिलांच्या संपत्ती वरील हक्क कायम असल्याचं गुजरात उच्च न्यायालयाने म्हटलं आहे. घटस्फोटाच्या दोन वेगवेगळ्या प्रकरणांवर सुनावणी करताना गुजरात उच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. पहिल्या पत्नीशी घटस्फोट घेतल्यानंतर एखाद्या पुरुषाने दुसरे लग्न केल्यानंतर पहिल्या पत्नीपासून झालेल्या मुलांना संपत्तीमध्ये अधिकार नाकारला जातो. मात्र गुजरात न्यायालयाच्या हा निकाल अशा प्रकरणांमध्ये दिशादर्शक ठरणार आहे. गुजरात उच्च न्यायालयात घटस्फोटाची दोन प्रकरणे दाखल होती. या प्रकरणांमध्ये भविष्यात वडिलांच्या संपत्तीत पहिल्या पत्नीच्या अल्पवयीन मुलांना हक्क मिळणार नाही, अशी अट वडिलांकडून घटस्फोटासाठी ठेवण्यात आली होती. याबाबत सुनावणी करताना न्यायालयाने वडिलांना फटकारले आहे. वडिलांच्या संपत्तीवर मुलाचा अधिकार नसेल या अटीवर घटस्फोट घेता येणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. जरी वडिलांना दुसरा विवाह केला तरी त्यांच्या संपत्तीत पहिल्या पत्नीच्या मुलांचा अधिकार कायम असेल, असा निकाल न्यायालयाने दिला आहे.

# 10 दिवसांचा नवजात चिमुरडा बेवारस अवस्थेत टेम्पोत आढळल्यानं आंबेगावात खळबळ!

पुणे : एक दहा दिवसांचं नवजात बाळ आढळून आल्यानं आंबेगावात खळबळ उडाली आहे. कात्रज-देहू रस्त्यावर एका टेम्पोमध्ये हे बाळ आढळून आलं. आढळून आलेलं बाळ हा एक मुलगा असून कुणीतरी त्याला कपड्यात लपेटून सोडून गेलं असल्याचा संशय व्यक्त केला जातो आहे. शनिवारी कात्रत-देहू बायपास रस्त्यावरील टेम्पोमध्ये रात्री 11 वाजण्याच्या सुमारास एक बाळ रडत असल्याचा आवाज येऊ लागल्यानं एका व्यक्तीनं पाहणी केली. त्यावेळी टेम्पोतील सामान ठेवायच्या जागेत हे बाळ कपड्यात गुंडाळलेलं आढलून



आलं. यानंतर आजूबाजूला मोठ्या प्रमाणात लोकं जमले. याबाबती माहिती नंतर पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी लगेचच घटनास्थळी धाव घेतली आणि बाळाला ताब्यात घेतलं. अवघ्या 10 दिवसांतं हे बाळ नाजूक असल्यानं त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याची माहिती पोलिसंनी दिली. या बाळाला निर्दयीपणे कोण टेम्पोत सोडून गेलं असावं? याचा आता पोलीस शोध घेत आहेत. टाईम्सने दिलेल्या वृत्तानुसार, या बाळाची प्रकृती स्थिर असून आता हे बाळ ससून रुग्णालयात आहे. ससून रुग्णालयातील जनरल वॉर्डमध्ये

वैद्यकीय तज्ज्ञांच्या देखरेखीखाली या बाळाला ठेवण्यात आलं आहे. भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन येथील वरीष्ठ पोलीस निरीक्षक जग्गनाथ कळसकर यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे. सामान वाहून नेणाऱ्या एका तीन चाकी टेम्पोच्या मागच्या बाजूला हे बाळ आढळून आलं होतं, असं ते म्हणाले.

# अल्पवयीन विद्यार्थीनीवर बलात्कार-धर्मांतर-निकाह करून गर्भवती बनवले; श्रीरामपुरातील धक्कादायक घटना...

श्रीरामपूर (प्रतिनिधी) -श्रीरामपूर शहरात वार्ड नं. २ मध्ये राहणारा आरोपी इम्रान कुरेशी उर्फ मुल्ला कटर, वय 35 वर्ष याने एका १६ वर्षे वयाच्या अल्पवयीन विद्यार्थीनीला शाळेतून पळवून नेवून तिचे जबरदस्तीने हिंदू धर्मातुन मुस्लीम धर्मात धर्मांतर करून तिच्यावर वेळोवेळी बलात्कार केला व बळजबरीने निकाहही केला. आरोपी हा विवाहित आहे. या घटनेने परिसरासह शहरात -पालक वर्गात प्रचंड खळबळ उडाली असून एसपी मनोज पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक स्वाती भोर, डिवायएसपी संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली या गंभीर गुन्हयातील




आरोपी इम्रान कुरेशी उर्फ मुल्ला कटर याला श्रीरामपूर शहर पोलिसांनी तातडीने अटक केली आहे. या अत्यंत गंभीर घटनेची अधिक माहिती अशी की,शहर परिसरात राहणाऱ्या एका 16 वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीवर इम्रान कुरेशी उर्फ मुल्ला कटर, राहणार -वार्ड नंबर ०२,श्रीरामपूर याने ती हिंदू मागासवर्गीय समाजाची आहे हे माहीत असताना देखील तिचे शाळेतून अपहरण केले व जबरदस्तीने उचलून नेऊन धर्मपरिवर्तन करून तिच्यासोबत निकाह केला.तसेच आरोपी इमरान कुरेशी याने वेळोवेळी जबरदस्तीने शरीरसंबंध केल्यामुळे ही अल्पवयीन विद्यार्थिनी गर्भवती झाली.तरीही आरोपी धमकी देऊन बळजबरीने तिच्यावर बलात्कार करीत आहे.याप्रमाणे पीडित विद्यार्थिनीच्या नातेवाईकांनी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यामुळे आरोपी इमरान कुरेशी उर्फ मुल्ला कटर याच्या विरोधात अपहरण ,बलात्कारासह, बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम व अ‍ॅट्रॉसिटी कायद्यातील कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या अतिशय गंभीर गुन्ह्याचा पुढील तपास डीवायएसपी श्री.संदीप मिटके हे स्वतः करीत आहेत.पोलीस तपासामध्ये अल्पवयीन विद्यार्थिनीला कोणत्या शाळेतून पळून नेले ?बळजबरीने धर्मांतर कोणत्या ठिकाणी करण्यात आले ? यासह आरोपीने इतर मुलींबाबत असे बलात्कार-धर्मांतराचे प्रकार केले आहे का? आणि त्याचे कोणी साथीदार या गुन्ह्यामध्ये आहे का ? याचा अतिशय काटेकोरपणे शोध घेण्यात येणार असल्याचे पोलिस सुत्रांनी सांगितले.

# अनिल देशमुखांचे 100 कोटी वसुली प्रकरण ! माजी पोलिस आयुक्त संजय पांडेंसह परबीर सिंहांची सीबीआयकडून चौकशी

मुंबई : माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्याशी संबंधित 100 कोटी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणात नवी अपडेच समोर आली आहे. या भ्रष्टाचार प्रकरणी मुंबईचे माजी पोलिस आयुक्त संजय पांडे व परबीर सिंह यांची सीबीआयने चौकशी केली. दिल्लीत 5 ते 6 तास चौकशी झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. याआधी ईडीनेही संजय पांडे यांची 8 तास चौकशी केली होती. पांडे यांच्या कुटुंबाशी संबंधित आयसेक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीतील एकूण 18 कोटी रुपयांच्या विविध व्यवहारांबाबत ही चौकशी करण्यात आली होती. ईडीकडून पांडे यांच्या कुटुंबीयांच्या कंपनीशी संबंधित 18 कोटी रुपयांच्या संशयास्पद व्यवहार ईडीकडून पांडे यांच्या कुटुंबीयांच्या कंपनीशी संबंधित 18 कोटी रुपयांच्या संशयास्पद व्यवहाराबाबत ईडीकडून तपास करण्यात येत आहे. हे सर्व व्यवहार कोणत्या माध्यमातून झाले तसेच हे व्यवहार कोणत्या कारणासाठी करण्यात आले होते, याबाबत तपास सुरू आहे. 1986 च्या तुकडीचे पोलिस अधिकारी असलेले पांडे 30 जूनला मुंबई पोलिस आयुक्त म्हणून सेवेतून निवृत्त झाले. पांडे यांनी 2001 मध्ये आयसेक सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ही माहिती तंत्रज्ञान (आयटी) कंपनी सुरू केली होती. अनिल देशमुखांवर नेमके कोणते आरोप मुंबई पोलिस आयुक्त परमबीर सिंह आणि पोलिस निरिक्षक सचिन वाझे यांनी अनिल देशमुख यांच्यावर 100 कोटी खंडणी गोळा करण्यास सांगितल्याचे गंभीर आरोप केलेत. हे प्रकरण न्यायालयात गेल्यानंतर कोर्टाने या प्रकरणात गुन्हा दाखल करून



सीबीआय चौकशीचे आदेश दिले. सीबीआयने गुन्हा दाखल केल्यानंतर ईडीने देखील या प्रकरणात कारवाईस सुरुवात केली. अनिल देशमुख यांच्यावर पदाचा गैरवापर करून भ्रष्टाचार केल्याचा आणि बेनामी संपत्ती गोळा केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.सर्व तपास CBI कडे मार्च 2022 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने मुंबईचे माजी पोलिस आयुक्त परमबीर सिंह यांच्याशी संबंधित सर्व प्रकरणांचा तपास सीबीआयकडे हस्तांतरीत करण्याचे निर्देश महाराष्ट्र सरकारला दिले होते. मागील अनेक महिन्यांपासून या मुद्द्यावरून चर्चा सुरू होती. विरोधकांनी देखील वारंवार यासंदर्भात मागणी केली होती. मात्र, महाराष्ट्र पोलिस यासंदर्भात तपास करतील, अशी भूमिका राज्य सरकारने घेतली होती. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भातला सर्व तपास सीबीआयकडे सोपवण्याचे निर्देश दिले होते. परमबीर सिंग यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहून देशमुखांवर मोठे आरोप केले होते. सचिन वाझे हे क्राईम इंटिलिजन्सचं यूनिट हेड करत होते. गेल्या वाझे हे अनिल देशमुखांना कित्येक वेळेस त्यांच्या ज्ञानेश्वर या निवासस्थानी बोलवलं आणि दर महिन्याला 100 कोटी रुपये जमा करायला सांगितलं.मुंबईत 1750 बार आणि रेस्टॉरंट आहेत आणि त्यातल्या प्रत्येकाकडून 2 ते 3 लाख रुपये जमा करा. त्यामुळे महिन्याला 40 ते 50 कोटी रुपये मिळतील. राहिलेली इतर रक्कम इतर मार्गांनी जमा करा. देशमुख इतर पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या निवसस्थानी बोलवायचे. त्यांनाही टार्गेट द्यायचे. मला किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांना अंधारात ठेवून देशमुख हे पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या बंगल्यावर बोलवायचे. टार्गेटनुससार ते पोलीस अधिकाऱ्यांना कार्यालयीन कामकाजात तसेच आर्थिक व्यवहारात सल्ला आणि निर्देश द्यायचे, असा दावा या पत्रात सिंग यांनी केला होता.

# मुलीची छेड काढताना हटकल्याने बाप-लेकावर हल्ला, वडिलांचा मृत्यू तर मुलाची प्रकृती गंभीर

मुलींची छेड काढल्याचा जाब विचारणाऱ्या बाप लेकावर जमावाने हल्ला करुन त्यांना बेदम मारहाण केल्याची घटना धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील निजामपूर गावात घडली आहे. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या एकाचा मृत्यू झाला असून दुसरा युवक नंदुरबारच्या रुग्णालयात अत्यवस्थ अवस्थेत उपचार घेत आहे. दरम्यान आरोपींना अटक केल्याशिवाय मृतदेह नेणार नसल्याची भूमिका संबंधितांनी घेतल्या. त्यामुळे पोलीस पथकाने पहाटेपर्यंत पाच आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान गावात शांततेचे वातावरण असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेऊ नये, असे आवाहन पोलीस अधीक्षक प्रवीणकुमार पाटील यांनी केले आहे.

**नेमकं काय घडलं?**

निजामपूर येथे राहणाऱ्या दोन मुली किराणा दुकानाकडे जात असताना गावातील सागर आणि मगन या दोघा मुलांनी त्यांचे हात पकडून त्यांची छेड काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी असरार



मुनाफ मणियार यांनी या दोघा मुलांना छेड काढू नका, असे सांगून हटकले. तसेच यावेळी सागर आणि मगन यांनी असरार याला बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. सागर याच्या हातात असलेल्या फळीला खिळे ठोकलेले असल्याने असरार मणियार याला गंभीर स्वरुपाच्या जखमा झाल्या.

दरम्यान असरार याचे वडील मुनाफ गफ्फार मणियार हे देखील भांडण सोडवण्यासाठी गेले असता त्यांना घटनास्थळावर असणाऱ्या अनिल, सतीश, शुभम, गोल्या आणि राकेश यांनी मारहाण करण्यास मदत केली. सागर खैरनार याने हातातील फळीने मुनाफ यांना डोक्याच्या मागील बाजूस गंभीर स्वरुपाची मारहाण केली. त्यामुळे मुनाफ जमिनीवर कोसळले तसेच असरार देखील गंभीर जखमी होऊन जमिनीवर पडला होता.

त्याच्या नाकातून रक्त निघत असल्याने त्याला शाहरुख शेख, अखिल शेख याने मोटरसायकलीवर बसवून जैताणे येथील ग्रामीण रुग्णालयात नेत असताना, असरार याने निजामपूर पोलीस ठाण्यात तक्रार द्यायची असल्याचे सांगून पोलीस ठाण्याकडे नेण्यास सांगितले. त्यावरुन पोलीस ठाण्यात नेले असता पोलिसांनी उपचारासाठी मेमो दिला. या दरम्यान उपचारासाठी त्याला आणले असता त्याला वैद्यकीय अधिकाऱ्यांनी नंदुरबार येथे रुग्णवाहिकेने येण्यास सांगितले. यावेळी शाहरुख शेख यांना भ्रमणध्वनीवरुन मोमीन खान हुसेन खान यांनी संपर्क करुन मुनाफ गफार मणियार हे गंभीर जखमी झाले असल्याचे सांगितले. तसेच त्यांच्या डोक्याला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली.

**नातेवाईकांचा संताप, मृतदेह घेण्यास नकार**

या घटनेमुळे निजामपूर शहरात एकच खळबळ उडाली. मुनाफ मणियार यांच्या नातेवाईकांनी त्यांचा मृतदेह निजामपूर पोलीस ठाण्याच्या आवारात आणून ठेवला. आरोपींना अटक केल्याशिवाय पुढील कार्यवाही करणार नसल्याची भूमिका घेतल्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान ही माहिती कळल्याने अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप मैराळे, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे निरीक्षक हेमंत पाटील हे अतिरिक्त पोलीस पथकांसह निजामपूर गावात पोहोचले. त्यांनी नातेवाईकांची समजूत घालण्याचा प्रयत्न सुरु केला.

या दरम्यान पोलीस पथकाने तातडीने हालचाली करत पाच आरोपींना ताब्यात घेतले आहे. आरोपींचे अटक सत्र सुरु झाल्यामुळे नातेवाईकांचा रोष कमी झाला. यादरम्यान रात्री सात जणांच्या विरोधात वेगवेगळया कलमांन्वये निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जावईबापू निघाले संधी साधू !

## सासरी चोरी करणाऱ्या जावयाला हडपसर पोलिसांकडून अटक

पुणे : महाराष्ट्रात जावयाला मोठा मान. जावई हे नातं असे आहे, की त्या नात्यासोबत आदर, सन्मान असं सगळं चालतच येतं. पण जावईच चोर निघाला तर मग? ऐकायचं विचित्र वाटत असलं, तरी असा खराखुरा प्रकार पुण्यात घडलाय. जावयानं आपल्या सासरी चोरी केली. मुख्य म्हणजे सासरचे कुणीच घरी नसताना जावयानं हा प्रताप केलाय. जावयाकडच्या दुसऱ्या चावीने त्यानं सासरचं घर उघडलं. घरातील दागिन्यांवर हात साफ केला. पुण्याच्या हडपसरमध्ये घडलेल्या या प्रकाराने सासरचे लोकंही चकीत झाले. अखेर पोलिसांना कळवण्यात आल. हडपसर पोलीस स्टेशनला तक्रार देण्यात आली. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आणि अखेर चोर असलेल्या जावयाला पोलिसांनी अटकही केली. शिवाय त्याच्याकडून चोरीचे दागिनेही जप्त करण्यात आले. याप्रकरणी हडपसर पोलीस सध्या पुढील कारवाई करत आहेत.

**कोण आहे तो जावई?**



निखिल पवार असं सासरी चोरी करणाऱ्या जावयाचं नाव आहे. निखिलने आपल्या कडे असलेल्या बनावट चावीने आपल्या सासरीच चोरी केली. बायकोच्या घरातली कुणीही घरी नाहीत, हे पाहून निखिलने आपल्याकडे असलेल्या बनावट चावीने फ्लॅटचा दरवाडा उघडला. घरातील मौल्यवान दागिन्यांवर हात साफ केला.

**सासरचे गेले सिनेमाला आणि..**

निखिलच्या सासरकडील सगळे लोक सिनेमा पाहण्यासाठी घराबाहेर गेले होते. त्यावेळी निखिलने सासरी घरात घुसून चोरी केली. निखिलच्या बायकोकडील नातलगांना शंका आल्यानंतर त्यांनी अखेर आपल्याच जावयाबाबत पोलीस स्थानकात तक्रार दिली. अखेर पोलीस तक्रारीनुसार गुन्हा नोंदवून घेत हडपसर पोलिसांनी निखिल पवार याला अटक केली आणि त्याच्याकडून साडे तीन लाख रुपयांचे चोरीचे दागिनेही जप्त केले.

चोरी झालेला मुद्देमाल पुन्हा निखिलच्या सासरकडच्यांना मिळाला. जावयानेच लज्जस्पद कृत्य केल्यानं निखिलच्या सासरच्या लोकांनाही मोठा धक्का बसला आहे. सध्या निखिल पोलिसांच्या ताब्यात असून त्याने अशाप्रकारे आणखीही काही चोऱ्या केल्यात का, याचा तपास पोलिसांकडून केला जातोय.

# बिल्डरच्या चुकीमुळे इमारतीच्या लिफ्ट मधून पडून महिलेचा जागीच मृत्यू



रायगडः पेण येथे इमारतीच्या लिफ्ट मधून पडून संगीता केलसकर या महिलेचा मृत्यू होण्याची घटना पेण शहरातील रामवाडी येथे रविवारी ( ता.17) घडली. बिल्डरकडे वारंवार केलेल्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याने महिलेचा नाहक जीव गेल्याचा आरोप रहिवाश्यांनी केला आहे. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली. रामवाडी येथील 'रॉयल गार्डीअल' या इमारती मधील भाडेकरू म्हणून राहणाऱ्या संगीता संदीप केळसकर (वय 49) या इमारती मधील लिफ्टने खाली येत होत्या. सदर लिफ्ट पाचव्या मजल्याच्या दरम्यान आली असता अचानक बंद पडली. यावेळी संगीता केळसकर यांनी लिफ्ट मधील सुरक्षा अलार्म दाबल्याने खाली असलेला सुरक्षारक्षक धावत आला. त्याने चावीचा वापर करून लिफ्टचा दरवाजा उघडून संगीता यांना पाचव्या मजल्यावर उतरवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान उतरत असतांनाच संगीता यांचा तोल जाऊन लिफ्टच्या होळात खाली पडून, त्यांचा जागीच मृत्यू झाला.

# 5 महिन्यात 3 वेळा दहावीतील विद्यार्थीनीवर स्कूल बस चालकाचा बलात्कार!

पुणे : पुण्यामध्ये 35 वर्षीय बस चालकाला अटक करण्यात आली आहे. शालेय विद्यार्थीनीचा बलात्कार केल्याप्रकरणी या बस चालकाला अटक करण्यात आली. कोंडवा पोलिसांनी रविवारी याप्रकरणी अटकेची कारवाई केली. या बस चालकाला आता पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. 15 वर्षांच्या मुलीसी गोड बोलून या बस चालकानं मैत्री केली होती. त्यानंतर तिच्यावर बलात्कार केला होता. या मुलीसोबत त्याने संबंध ठेवल्याप्रकरणाचा खुलासाही धक्कादायक पद्धतीने झाला होता. 16 जुलै रोजी 15 वर्षांची विद्यार्थीनी आरोपी स्कूल बस चालकाला भेटून रात्री उशिरा घरी परतली होती. त्यावेळी या मुलीच्या आईला संशय आला. त्यानंतर या प्रकरणाचा हळूहळू उलगडा झाला. आईने मुलीची चौकशी केल्यानंतर हे धक्कादायक प्रकरण उघडकीस आलं. अखेर पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने पोलिसांत तक्रार दिली आणि मग पुढील कारवाई केली गेली. धक्क्दायक पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी स्कूल बस ड्रायव्हरला रविवारी अटक केली होती. दरम्यान. मुलीच्या संमतीने संबंध ठेवल्याचा दावा आरोपी स्कूल बस चालकाने केला होता.



पण बलात्कार प्रकरणात अल्पवयीन मुलीच्या संमतीचा प्रश्नत येत नसल्यानं अखेर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी स्कूल बस चालकालाही बेड्या ठोकण्यात आला आहे. कलम 376 नुसार बलात्काराच्या गुन्ह्याखाली या स्कूल बस चालकावर आता खटला चालवला जाणार आहे. दरम्यान, पोलिसांनी रविवारीच या आरोपीला कोर्टासमोर हजर केलं होतं. कोर्टानं 25 जुलैपर्यंत आरोपीला पोलीस कोठडी सुनावली आहे. 3 वेळा बलात्कार! स्कूलबस चालकानं मार्च ते जुलै दरम्यान, तीन वेळा या मुलीवर बलात्कार केला, असा आरोप करण्यात आला आहे. या मुलीसोबत मैत्री करत स्कूल बस चालकानं तिच्याशी संबंध वाढवले. त्यानंतर तिचा बलात्कार केला, असा गंभीर आरोप केला गेलाय. रविवारी आरोपी ड्रायव्हरला पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याला लगेचच कोर्टासमोर हजर करण्यात आलं होतं. याप्रकरणी कोंडवा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक लेखाजी शिंदे यांनी अधिक माहिती दिली आहे. अल्पवयीन मुलीच्या बलात्कार प्रकरणा मुलीच्या संमतीचा मुद्दा ग्राह्य धरला जात नाही. एका दहावीत शिकणाऱ्या मुलीवर स्कूल बस ड्रायव्हरने हा बलात्कार केलाय. ही मुलगी स्कूल बसनेच ये-जा करत होता. स्कूल बस चालकाने आपल्या जाळ्यात या मुलीला ओढलं. तिच्या चांगले संबंध बनवले आणि तिला शरीरसुखासाठी भाग पाडलं, असंही ते म्हणालेत.


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव ( पूर्व ), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर ( पूर्व ), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. ( सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ). संपर्कः-9594418181 / 8424989898